# 'सुरक्षेसाठी वर्षभर मोटरमनची हजेरी

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

**विनामोटरमन मेट्रो-३चा प्रयोग**

'विनामोटरमन मेट्रो' हा प्रयोग आगामी काळात कुलाबा-वांद्रे-सीप्झ मार्गावर केला जाणार असून, पूर्णपणे कॉम्प्युटर प्रणालीवर ही मेट्रो चालणार आहे. मात्र, खबरदारी आणि प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सुरुवातीला वर्षभर मेट्रोत मोटरमनची हजेरी असेल.

मेट्रो ट्रेन कम्प्युटर प्रणालीनेच सुरू होईल. परंतु, ट्रेन सुरू होताना बटन दाबून ट्रेनचे दरवाजे बंद करण्याचे काम मात्र मोटरमनचे असेल. नव्या यंत्रणेची सवय होईपर्यंत प्रवासी चढ-उतार करताना काही गडबड होऊ नये यासाठी ही दक्षता घेतली जाईल. विनामोटरमनचा प्रयोग वर्षभर यशस्वी झाला आणि त्यास रेल्वे सुरक्षा आयुक्तालयाचे प्रमाणपत्र मिळाले की मग मोटरमनची आवश्यकता राहणार नाही. मात्र, त्यानंतरही प्रत्येक स्टेशनवर एक तज्ज्ञ उपस्थित असेल. प्लॅटफॉर्मवर आलेल्या ट्रेनमध्ये समजा काही बिघाड झाला, तर ती तज्ज्ञ व्यक्ती पुढील कार्यवाही करेल.

'मेट्रो ३' मार्गावरील ट्रेन वाय-फाय प्रणालीवर चालणार आहेत. त्यामुळे दोन ट्रेनमधील अंतर व वेग निश्चित असेल. समोरची ट्रेन काही कारणास्तव थांबली तर त्याची आगाऊ सूचना मागील ट्रेनला मिळून ती सुरक्षित अंतरावर थांबेल.

## वृक्षतोडीशिवाय मेट्रो अशक्य

'उपनगरी रेल्वे बांधतानाही झाडे तोडावी लागली होती. यापूर्वीही अनेक प्रकल्प पूर्ण करताना काही प्रमाणात झाडांची तोड करावी लागत होती. त्याच धर्तीवर 'मेट्रो ३' प्रकल्पाकरिताही काही झाडे तोडावी लागणार आहेत. त्यामुळे 'झाडे न तोडता मेट्रो करा' असे म्हणणे केवळ कल्पनाविलास आहे. झाडे तोडायची नसतील तर मेट्रो होणार नाही', असे मत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी मांडले. या प्रकल्पाच्या सद्यस्थितीविषयी त्यांनी गुरुवारी सुमारे दोन तास पत्रकारांना सादरीकरण करून सर्व शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न केला. या प्रकल्पात प्रत्येक टप्प्यावर शक्य तेवढ्या कमी प्रमाणात झाडे तोडली जातील, यावरच भर दिला असून असंख्य झाडे वाचवलीही आहेत. शिवाय तोडल्या जाणाऱ्या झाडांच्या मोबदल्यात मोठ्या संख्येने नवी झाडे लावली जाणार आहेत, असे त्या म्हणाल्या.